दस्ताचे मुद्रांक शुल्काबाबत अभिनिर्णय करणेबाबतची कार्यपध्दती.

(Adjudication of document for assessment of Stamp Duty)

**1)** विषयांचा संक्षिप्त तपशील- एखाद्या दस्तास महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमान्वये किती मुद्रांक शुल्क देय आहे,याबाबत संबंधित दस्तातील पक्षकारांनी दस्ताच्या प्रतीसह लेखी अर्ज केल्यास, त्या दस्ताचे मुद्रांक शुल्क निश्चित करुन पक्षकारांना कळविणे.,

**2)** आवश्यक कागदपत्रे-

अ) अभिनिर्णयासाठी विहित नमुन्यातील अर्ज (अर्जाचा नमुना नोंदणी व मुद्रांक विभागाच्या www.igrmaharashtra.gov.in या संकेतस्थळावर Downloads या सदराखाली Forms या ठिकाणी उपलब्ध)

ब) अर्जास रु. 5/- चा कोर्ट फी स्टॅम्प (लेबल स्वरुपात)

क) मूळ दस्त व त्याची प्रत

ड) दस्ताचे मूल्यांकन / मुद्रांक शुल्क ज्या बाबींवर अवलंबून आहे, त्या सर्व बाबी दर्शविणारी कागदपत्रे / पुरावे व आवश्यकता असल्यास प्रतिज्ञापत्र.

**3)** आवश्यक शुल्क – महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाचे कलम 31 नुसार रु- 100/- रोखीने.

**4)** कार्यपध्दतीविषयी सविस्तर माहिती मिळण्याचे ठिकाण-

अ) मुंबई शहर व मुबई उपनगर जिल्हयामध्ये मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय

ब) उर्वरित महाराष्ट्रात सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय

क)विभागाच्या www.igrmaharashtra.gov.in या संकेतस्थळावर Activities या सदराखाली Stamp Duty Collection या ठिकाणी उपलब्ध

**5)** निर्णय घेणारे अधिकारी :- संबंधित मुद्रांक जिल्हाधिकारी

**6)** विहित कालावधीमध्ये अभिनिर्णय न केल्यास त्याबाबतची लेखी कारणे लेखी स्वरुपात देण्यास जबाबदार अधिकारी:- संबंधित मुद्रांक जिल्हाधिकारी

**7)** या प्रक्रीयेबाबत ज्याच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी, त्या कार्यालयाचा पत्ता व दूरध्वनी क्रमांक :-

अ)मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हयाचे संदर्भात अपर मुद्रांक नियंत्रक,मुंबई

ब) उर्वरित महाराष्ट्रात, संबंधीत प्रादेशिक विभागाचे नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक (सविस्तर यादी विभागाच्या www.igrmaharashtra.gov.in या संकेतस्थळावर Organization या सदराखाली Offices या ठिकाणी उपलब्ध )

क)तक्रारीच्या अनुषंगाने अपर मुद्रांक नियंत्रक / नोंदणी उपमहानिरीक्षक यांनी केलेल्या कार्यवाहीने नागरिकांचे समाधान न झाल्यास, नागरिकांनी feedback@igrmaharashtra.gov.in या मेलवर आपली प्रतिक्रीया नोंदवावी.

8) मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी दिलेला निर्णय मान्य नसल्यास त्या त्या निर्णयाविरुध्द कोणत्या तरतूदीनुसार कोणत्या प्राधिकरणाकडे अपील करता येईल.

अ) मूल्यांकनाबाबतचा निर्णय मान्य नसल्यास – महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाचे कलम 32 ब अन्वये – मुंबईमध्ये अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई यांचेकडे तर उर्वरित महाराष्ट्रात संबंधीत प्रादेशिक विभागाचे नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक यांचेकडे दाखल करणे.

ब) दस्ताचे वर्गीकरण / मुद्रांक शुल्क आकारणीबाबतचा निर्णय मान्य नसल्यास – महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाचे कलम 53 अन्वये मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी तथा नोंदणी महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे दाखल करणे.

क) मूल्यांकन व दस्ताचे वर्गीकरण / मुद्रांक शुल्क आकारणी या दोन्ही बाबतचा निर्णय मान्य नसल्यास – मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी तथा नोंदणी महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे दाखल करणे.